मा.अध्यक्ष महोदय व सन्मा. सभागृह,



प्रशांत राऊत
सभापती, स्थायी समिती

वसई विरार शहर महानगरपालिकेचे हे नववे अंदाजपत्रक सादर करण्याची संधी मला लोकनेते मा.श्री हितेंद्रजी ठाकूर साहेब यांनी दिली याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे. लोकनेते मा.आमदार श्री हितेंद्र ठाकूर साहेब, मा. प्रथम महापौर श्री.राजीवजी पाटील साहेब, द्वितीय महापौर श्री.नारायणजी मानकर साहेब, व मा.प्रथम महिला महापौर सौ.प्रविणाताई ठाकूर मॅडम, माजी महापौर मा.श्री.रुपेशजी जाधव, यांच्या कुशल नेतृत्वाखाली काम करण्याची मलासंधी मिळाली यात मी धन्यता मानतो. तसेच सद्याचे मा. महापौर श्री. प्रविणजी शेट्टी व मा. उपमहापौर श्री. प्रकाशजी रॉड्रिक्स साहेब यांच्या वेळोवेळीच्या सूचना लक्षात घेऊन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी तयार केलेला हा नववा व स्थायी समिती सभापती म्हणून माझे कार्यकाळातील पहिला व परिवहन उपक्रमाचा परिवहन समितीने तयार केलेला सहावा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्याचा बहुमान मला मिळाला, याबद्दल मी त्यांचा वा आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आपले आदरणीय लोकनेते मा. आमदार श्री.हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा.खासदार श्री.राजेंद्रजी गावीत, मा. पालकमंत्री दादाजी भुसे, तत्कालीन खासदार बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा.आमदार श्री. राजेशजी पाटील साहेब, मा.आमदार श्री. निरंजनजी डावखरे साहेब, माजी महापौर व माजी उपमहापौर भूतपूर्व नगरपरिषदांचे माजी नगराध्यक्ष व इतर सन्मा. पदाधिकाऱ्यांसह दिलेल्या भेटीमध्ये मा.नाम.मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब, तत्कालीन मा.नाम.मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, मा. खासदार स्वर्गीय श्री. चिंतामणजी वनगा साहेब, माजी पालकमंत्री मा.नाम.श्री. विष्णुजी सावरा साहेब, विधानपरिषदेचे तत्कालीन उपसभापती स्वर्गीय मा.नाम.श्री. वसंतजी डावखरे साहेब, तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, तत्कालीन व आत्ताचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार साहेब, मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाचे आजी माजी आयुक्त तसेच केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे सनदी अधिकारी यांचे वेळोवेळीचे मार्गदर्शन व सदिच्छा आपल्या पाठीशी सदैव राहील्या आहेत.

बहुजनांचा विकास करुन बहुजनांच्या हितासाठी असलेला बहुजनांचाच विकास हा अर्थसंकल्प सादर करताना मा. प्रथम महिला महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर मॅडम, माजी महापौर मा.श्री.रुपेश जाधव, माजी उपमहापौर मा.श्री.उमेशजी नाईक साहेब, माजी उपमहापौर श्री.सगिरजी डांगे साहेब, मा.सभागृह नेते श्री.फ्रँक डिसोजा साहेब, माजी स्थायी समितीचे सभापती मा.श्री. जितेंद्रजी शहा साहेब, मा.श्री.नारायणजी मानकर साहेब, मा.श्री. अजीवजी पाटील साहेब, मा.श्री.संदेशजी जाधव साहेब, मा.श्री. नितीनजी राऊत साहेब, मा.श्री.अफिफजी शेख साहेब व मा.श्री. सुदेशजी चौधरी यांचे नियमित व विशेष मार्गदर्शन तसेच सर्व प्रभाग समित्यांचे सभापती सर्व पदाधिकारी यांनी मला वेळोवेळी भेटून केलेल्या मौलिक सूचना.

महानगरपालिकेचे अंदाजपत्रक म्हणजे संकल्प व संकल्पपूर्तीचा लेखाजोखा असतो. त्या दृष्टीने अंदाजपत्रकासोबत दिलेल्या आकडेवारीवरुन गेल्या तीन वर्षात प्रत्यक्षात केलेली वाटचाल ही आपल्यासमोर या अंदाजपत्रकातील आकडेवारीवरुन येते. तसेच आगामी वर्षातील तरतुदीद्वारे आपण तयार केलेल्या विकास योजना अंदाजपत्रकाच्या रुपाने आपल्यासमोर येतात. परंतु संकल्प व पूर्ती नेहमीच तत्परतेने होते असे नाही, सदर विकास कामे ही त्या त्या आर्थिक वर्षात पूर्ण करावयाचा मनोदय असतो.

अर्थसंकल्पात अनेक आर्थिक तसेच इतरही उपक्रम हाती घेण्याचे आपण योजत असतो तसेच काही धोरणांचा पाठपुरावा ही करत असतो. या उपक्रमांना आणि धोरणांना आवश्यक महसूल गोळा करणे आणि खर्च पत्करणे या स्वरुपात आर्थिक योजना असतात. त्याचप्रमाणे महानगरपालिका पुढच्या वर्षात कोणत्या धोरणांचा आणि उद्दिष्टांचा पाठपुरावा करणार आहे. हे देखील सांगत असते आणि त्या योजनांनुसार आर्थिक आराखडा रेखाटत असते. असा हा आर्थिक आराखडा तपशीलासह विविध विभागांसह उद्देशित जमा आणि नियोजित खर्च यांचे आरेखन करत असतो. म्हणजेच अर्थसंकल्प गतवर्षीचा आर्थिक लेखा, चालू वर्षाचे सुधारीत अंदाज आणि आगामी वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज या गोष्टी दाखवत असते आणि म्हणूनच अर्थसंकल्प म्हणजे महानगरपालिकेची राजकोषीय धोरणे आणि तरतुदीनुसार आर्थिक योजना याचे स्पष्टीकरण असते.

नागरी स्थानिक संस्थांना विकास विषयक वेगवेगळ्या प्रकारची कामे करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना पुरेसे आर्थिक स्त्रोतही उपलब्ध करुन दिले पाहिजेत. पुरेसे महसूल स्त्रोत उपलब्ध करुन न देता, केवळ कामे वाटून अर्थसंकल्पामध्ये विकास कामे दर्शविल्याने कोणतेही सकारात्मक परिणाम दिसून येणे शक्य नाही. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून ज्या जबाबदाऱ्या पार पाडल्या जाण्याची अपेक्षा केली जात आहे. तितक्याच प्रमाणात कर व महसुलाच्या इतर स्त्रोतांच्या बाबतीतही स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार, जास्तीत जास्त लाभदायक पद्धतीने महसूल स्त्रोतांचा वापर करण्याचे व शहरांच्या गरजांनुसार विविध सेवा पुरविण्यासाठी या महसुलांचा वापर करण्याचे अधिकार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना असणे आवश्यक

आहे. पण तसे होताना दिसत नाही म्हणून अर्थसंकल्पातील कामे रेंगाळतात. यावरुन हे स्पष्ट होते की, एका विशिष्ट मर्यादेपर्यंत पालिकांना करांमध्ये फेर बदल करणे, त्यांचे दर ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहेत मात्र, त्या उपर नवीन कर ठरविण्याचे व ते आकारण्याचा निर्णय पालिकांना राज्य शासनाच्या संमतीशिवाय घेता येत नाही.

७४ व्या घटना दुरुस्तीमुळे कायद्यांमध्ये सत्ता विकेंद्रीकरणाच्या सुधारणा झाल्या असल्या तरीही याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व आर्थिक संसाधने मात्र दिली गेली नाहीत हे वास्तव आहे. असे असले तरी उपलब्ध निधी व मनुष्यबळ संसाधने याचे योग्य नियोजन करुन महानगराचा सर्वांगिण विकास त्याचबरोबर मुलभूत सोयी सुविधा पूरविण्याचा पूर्ण प्रयत्न वसई विरार शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून मा.लोकनेते श्री. हितेंद्र ठाकूर यांच्या कुशल नेतृत्व व मार्गदर्शनाखाली आम्ही करीत आहोत.

**अर्थसंकल्पातील खालील महत्वाच्या तरतूदींचा उल्लेख मी करु इच्छितो.**

**मालमत्ता कर** :- महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करुन नव्याने कर आकारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मालमत्ता करात भरीव वाढ होऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. ऑनलाईन सुविधेद्वारे मालमत्ता कराचा भरणा करण्याची सुविधा उपलब्ध आहे. मालमत्ता करापासून सन २०२०-२१ मध्ये रु. १५५ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

**मालमत्ता कराबाबत महानगरपालिकेने प्रोत्साहनपर खालील विशेष तरतुदी केल्या आहेत.**

- आगामी वर्षात देखील ५ वर्षाचा मालमत्ता कर आगाऊ भरण्याऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात १५% दराने प्रोत्साहनपर सवलत देण्याची तरतुद केली आहे.
- स्वातंत्र सैनिक त्यांची विधवा पत्नी तसेच त्यांचे पुढील पहिल्या पिढीतील एका वारसाला त्याच्या राहत्या निवासी सदनिकेस वेळीवेळीच्या मागणी नुसार मालमत्ता करात १०० % सुट आहे.
- आजी माजी सैनिक अथवा त्यांचे अवलंबीतास मागणीनुसार मालमत्ता करात ५० % सुट आहे.

- नव्याने बांधकाम परवानगी देताना विकासकांनी इमारतीमध्ये पाण्याचा पुर्नवापर करणेसाठी स्वतंत्र उपाययोजना करण्याचे बंधन घातले जात असून सद्यस्थितीतील जे मालमत्ता धारक पिण्याचा पाण्याव्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा पुर्नवापर करण्याची योजना महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या संमतीने अंमलात आणतील त्यांना पाणी पट्टीच्या देयकात २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अनुदान स्वरुपात अदा करणेची तरतूद केली आहे.
- नव्याने विकसित केल्या जाणाऱ्या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टींग योजनेची अंमलबजावणी सक्तीने चालू असून यामुळे नविन इमारतींना रेन हार्वेस्टींगची व्यवस्था झाली आहे. त्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढणेस मदत झाली आहे व होत आहे. सबब अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत महानगरपालिकेच्या संमतीने रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामध्ये सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ठ असल्याने मालमत्ता कराच्या २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अनुदान स्वरुपात अदा करणेची तरतूद केली आहे.
- निसर्ग ऋण प्रकल्प राबविणेसाठी एकत्रित मालमत्ता कराच्या २ % सवलतीसह योजना खर्चाच्या २० % परंतु अधिकतम रु. १ लक्ष इतका खर्च अनुदान स्वरुपात अदा करणेची तरतूद केली आहे.

**स्थानिक संस्था कर** :- स्थानिक संस्था कराची दाखल विवरणे कालबद्ध मर्यादेमध्ये तपासून घेऊन महानगरपालिकेची मागणी निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही होईल अशी अपेक्षा असून स्थानिक संस्था करापासून सन २०२०-२१ मध्ये रु. ५ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

**पाणीपुरवठा सेवा**:- महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यांत आले असुन त्याद्वारे अनधिकृत नळजोडण्या शोधून काढून त्या नळजोडण्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या जोडण्या नियमीत करुन घेण्याची संधी ग्राहकाला देण्यात येईल ज्यामुळे महानगरपालिकेचे होणारे नुकसान बंद होऊन उत्पन्नात कायमस्वरुपी भर पडेल. **सद्यस्थितीत मनपाद्वारे होणारा पाणी पुरवठा ठोक स्वरूपात होत असल्याने पाणी पट्टी आकारणी देखील ठोक स्वरुपात वसुल केली जाते. प्रत्यक्ष वापरानुसार मागणी देयके बजावल्यास पाणी पट्टी उत्पन्नात भरीव वाढ अपेक्षित आहे.** पाणीपुरवठा सेवेपासून सन २०२०-२१ मध्ये रु. १७८ कोटी ८८ लक्ष ३५ हजार इतक्या उत्पन्न अपेक्षित आहे.

**जाहिरात परवाना फी व जागा भाडे** :- जाहिरात कर व जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेचे भाडे हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन आहे. जाहिरात कर व जागेच्या भाड्यापोटी उत्पन्न महानगरपालिकेला मिळू शकते याचा विचार करुन नविन जाहिरात धोरण ठरविण्यात आले आहे. जाहिरात करापासून सन २०२०-२१ मध्ये रु. ५५ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी अर्थसंकल्पातील विविध जमा लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविणाऱ्यात आल्या असून ते अपेक्षित उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीने शासकिय अनुदाने प्राप्त होण्यासाठी शासन दरबारी त्याचा पाठपुरावा करणे त्याचप्रामणे करवसुली व इतर सेवा वसुलीसाठी महानगरपालिकेच्या प्रशासनाच्यावतीने कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**दिवाबत्ती :** दुरुस्ती देखभालीच्यावेळी सद्याचे असलेले रस्त्यावरील पथदिवे बदलून एल.ई.डी चे पथदिवे लावले जातील. त्यामुळे महसुली खर्चात चांगलीच कपात देखील अपेक्षित आहे.

**अग्निशमन सेवा :** आपली अग्निशमन सेवा ही अत्याधुनिक सेवा साधनाने परिपूर्ण आहे. सध्या आपल्याकडे सहा अग्निशमन केंद्र असून नव्याने अजून सहा अग्निशमन केंद्र प्रस्तावित आहेत. वालीव, पेल्हार, वसई पारनाका येथेही अग्निशमन केंद्रे प्रस्तावित आहेत. मुख्य अग्निशमन नियंत्रण कक्ष आधुनिक संपर्क यंत्रणेसहीत आचोळे येथे उभारण्यात येणार आहे. यासाठी १० कोटीची तरतूद आहे. आणि मुख्य म्हणजे ६७ मीटर उंच जात असलेले आधुनिक यंत्रणा असलेले हॅजमॅट वाहन अग्निशमन विभागाच्या ताफयात दाखल होणार असून त्यासाठी ५९ कोटीची तरतूद केली आहे.

**घनकचरा व्यवस्थापन :**

शहर स्वच्छतेमधून निघणाऱ्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन ही सर्वच शहरांना भेडसावणारी गंभीर समस्या असून घनकचऱ्याचे वर्गीकरण करुन त्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन केल्यास या कचऱ्याचा काही भाग पुर्नप्रक्रियेसाठी वापरता येऊन उर्वरीत कचऱ्याची विल्हेवाट लावणे सोयीस्कर होईल यासाठी गृहनिर्माण संस्थांनी ओल्या कचऱ्यापासून खत निर्मीती करुन त्याचा वापर आपल्याच आवारात वृक्ष संवर्धनासाठी केल्यास ते पर्यावरणाच्या दृष्टीने देखील पोषकच ठरेल. प्लास्टिक पिशव्यांच्या विक्री व वापरावर नियंत्रण आणून पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या व अनेक नागरी समस्या निर्माण होण्यास कारणीभूत असलेल्या प्लास्टिक पिशव्या व्यवहारातून हद्दपार करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून

जनजागृतीसह दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे. शहर स्वच्छतेसाठी व आरोग्य विषय कामासाठी २०२०-२१ मध्ये रुपये २१२ कोटी ८ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

## आरोग्य सेवा

महानगरपालिका हद्दीत ७० खाटांचे 'सर डी एम पेटीट' रुग्णालय कार्यरत असून २१ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २ हॉस्पिटल्स, ३ माता बाल संगोपन केंद्रे व ९ दवाखाने येथे विविध वैद्यकिय सेवा उपलब्ध आहेत.

- मा. आमदार क्षितीज ठाकूर यांच्या प्रयत्नाने हायवेलगत १०० बेडचे ट्रॉमा सेंटर उभारण्यास मंजूरी व ते २०० बेडपर्यंत वाढवून मिळविण्यासाठी शासनदरबारी पत्रव्यवहार सुरु आहेत व नजिकच्या काळात शासन मंजुरीची अपेक्षा आहे.
- महानगरपालिकेच्या विविध योजनांतर्गत गरोदर मातांना नोंदणी ते बाळंतपण व त्यानंतर सहा आठवडयापर्यंत लागणाऱ्या सर्व चाचण्या विनामुल्य, सोनोग्राफी, औषधोपचार, प्रसूती, आवश्यक असल्यास सिझेरियन या व्यतिरिक्त एससी-एसटी-बीपीएल धारकांना प्रसुतीसाठी रुपये ६००/- अथवा सिझेरियनसाठी रुपये १५००/- जादा अर्थसहाय्य शासनाच्य मदतीने रुग्णांपर्यंत पोहचविले जाते. महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी अधिक भर देण्यात आला असून तद्नुसार वाढीव तरतुदी प्रस्तावित केल्या आहेत.
- विनामूल्य वैद्यकिय सेवा देणारी महाराष्ट्रातील आपली पहिली महानगरपालिका आहे.

एकूण रुग्णालय व्यवस्थापनासाठी सन २०१९-२० मध्ये रु. ४६ कोटी ९४ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ६५ कोटी १३ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

**आपत्ती व्यवस्थापन :** आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था, परिस्थिती नियंत्रणासाठी पोलिस मदतीसह हेलिकॉप्टर, आधुनिक बिनतारी संदेश यंत्रणा, जीवरक्षक बोट, पाणी खेचण्यासाठी जास्त क्षमतेचे पंप यासाठी सन २०२०-२१ मध्ये रुपये ३ कोटी ९२ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

**स्मशानभूमी व दफनभूमी :**

महापालिका हद्दीत एकूण ११४ स्मशानभूमी दफनभूमी असून त्यापैकी बहुतांश विकसीत आहेत.

दहनविधीसाठी मोफत लाकडे. दफनविधीसाठी रुपये १,०००/- अनुदान देण्यात येत आहे.

गॅसदाहिनी वापर करणाऱ्यांना रुपये १,०००/- अनुदान देण्यात येत आहे.

शहरातील तुळींज, कामण, समेळ, खैरपाडा, बापाणे, शिरसाड, कोल्ही, तारकेनगर, किरवली, पापडी, तांबडीपाडा, आगाशी व पुरापाडा अशा एकूण १४ स्मशानभूमीच्या विकास कामांसाठी २०२०-२१ साठी ११ कोटी १ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

**वनस्पती उद्यान, उद्यान, मत्स्यालय, बर्ड पार्क, पक्षी अभयारण्य**

महानगपालिकेतर्फे आधुनिक अशा विविध प्रकारच्या उद्यानांचा विकास करण्याची योजना आहे.

**वनस्पती उद्यान :** महानगरपालकिकेकडून जमिनीचा वापर न करता केवळ पाण्यात वनस्पती वाढवण्याची प्रक्रिया करुन वाढवलेली बाग (हायड्रोपॉनिक्स) व एकमेकांशी जुळवून घेणाऱ्या नात्यांमध्ये जलचरांना आणि किनाऱ्यावरील सजीवांना जगता येईल असे वातावरण बनवून केलेली बाग (ॲक्वापॉनिक्स) इत्यादी तंत्रज्ञानाचा वापर करुन उष्ण कटीबंधीय बाग (ट्रॉपिकल), रसाळ बाग (सक्युलंट), मुघल गार्डन व घरातील वनस्पती उद्यान (इनडोअर बोटॅनिकल गार्डन) अशा ६ प्रकारच्या पद्धतीचा समावेश करुन गार्डन्सची निर्मिती करण्यात येणार आहे.

**उद्यान व तलाव व्यवस्था :** महापालिका हद्दीत १० नवीन उद्याने तयार करण्यात येणार असून, त्यापैकी नारंगी विरार (पूर्व) व पेल्हार धरणालगत पिकनिक पार्क चा विकास ही आपल्या शहरातील आकर्षणाची केंद्र राहतील. तसेच चाकणपाडा, गिरीज, सालोली, नाळे, मांडवी, उतळेश्वर यासह एकूण १७ तलावांचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. काही तलावांवर जेथे जेष्ठ नागरिक फेरफटका मारण्यासाठी, हास्य क्लब साठी येत असतात तेथे सौम्य प्रकारचे संगीत वाजवण्याची व्यवस्था केली जाईल, जेणेकरुन त्या जेष्ठ नागरिकांचे मनोरंजन होईल.

**मत्सालय :** त्याचबरोबर आपल्या महानगरपालिकेतर्फे असे मत्स्यालय बनवण्याची योजना आहे की त्यात सागरी विश्वातील विविध प्रजांतीचे मासे, समुद्री जीव, वनस्पती, शोभिंवत पाळीव मासे यांचे निरीक्षण व अभ्यास करण्याची संधी विद्यार्थी व नागरिक यांना मिळेल. तसेच त्याचठिकाणी डायव्हिंग, स्कूबा डायव्हिंग यांची प्रात्यक्षिके या मत्स्यालयामुळे बघायला मिळणार आहे.

**बर्ड पार्क :** पक्षी म्हणजे निसर्गाची नितांत सुंदर आणि रंगीबेरंगी निर्मिती आहे. त्यामुळे त्यांचे संरक्षण व संवर्धन होणे महत्वाचे आहे. यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे विरार नारिंगी येथील देव डोंगरी परिसरातील २५ एकर क्षेत्रावर जगभरातील विविध प्रकारच्या प्रजातींमधील ५०० हून अधिक पक्ष्यांचा समावेश असलेले पक्षी विहार साकारण्याची मा. आमदार क्षितीज ठाकूर यांची योजना आहे.

**पक्षी अभयारण्य :** दरवर्षी ५० हेक्टर याप्रमाणे पाच वर्षात २५० हेक्टर मानवनिर्मित जंगल विकसीत करण्याचे काम वनविकास महामंडळ यांना देण्यात आले आहे. आपल्या येथील वातावरणात कोणकोणते पक्षी राहू शकतील, कोणकोणत्या झाडावर कोणकोणते पक्षी राहतात, आपली घरटी बनवतात, कोणकोणती फळे खातात इत्यादी बाबींचा अभ्यास करुन हे पक्षी अभयारण्य तयार करण्यात येणार आहे.

**शिक्षण :**

आपले मा. आमदार क्षितीज ठाकूर हे आपल्या शहरातील बेरोजगार तरुणांना किंवा शिक्षण नोकरी साठी मुंबई पर्यंत जाणाऱ्या नागरिकांना आपल्या वसई विरार शहरातच आधुनिक शिक्षण व रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील राहिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मा. आमदार क्षितीज ठाकूर यांच्या प्रयत्नाने ६० ते ६५ हजार फी द्यावी लागणारे सॅप या तंत्रज्ञानाचे शिक्षण अवघ्या रुपये १० हजारात उपलब्ध करुन दिले असून, सदरील प्रशिक्षणाद्धारे येथील तरुणांना नामवंत कंपनीत उत्तम पगाराची नोकरी मिळण्यास सहाय्य होणार आहे.

**क्रीडा विषयक कार्यक्रम** : - विरार येथील म्हाडा वसाहती नजिक भव्य क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर असुन या संकुलात ऑलिंपिक साईज तरण तलाव, ४०० मीटरचा सिंथेटीक रनिंग ट्रॅक, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक, हातोडाफेक, फुटबॉल इत्यादी खेळांच्या सुविधांसह बास्केटबॉल, बॅडमिंटन, टेबलटेनिस या खेळांबरोबर

मार्शल आर्ट, योगाभ्यास यासाठी इनडोअर सुविधा असणार आहे. सदरचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच दिवाणमान तरण तलाव इमारतीच्या दुस-या मजल्यावर शुटींग रेंज सुरु करण्यात आली आहे.

**क्रीडा साधना योजना** :- भारतीय खेळ प्राधिकरणाने खेळाडू व्यक्तीची प्रशिक्षणासाठी निवड केल्यास अशा खेळाडूला प्रशिक्षण कालावधीसाठी दरमहा रु. ६०००/- प्रशिक्षण भत्ता क्रीडा साधना योजनेंतर्गत देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

**क्रीडा संजीवनी योजना** :- जागतिक ऑलिंपिक संघटना, भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या देशातील अधिकृत राष्ट्रीय क्रीडा संघटना व राज्य क्रीडा संघटनांनी आयोजित केलेल्या स्पर्धांमधील सुवर्ण, रौप्य व कास्य पदके मिळविणाऱ्या स्पर्धकांना पारितोषिके देऊन तसेच स्पर्धेमध्ये सहाभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणाऱ्या स्पर्धकाला प्रोस्ताहनपर अनुदान देऊन क्रीडा संजीवनी योजनेंतर्गत त्यांचा गौरव करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

**विविध संस्थांना विशेष योजनांतर्गत सहाय्य:-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वृद्धाश्रम, महिलाश्रम, अनाथालये चालविणाऱ्या संस्था, ज्येष्ठ नागरीकांच्या संस्था, महिलांच्या संस्था, शैक्षणिक संस्था, क्रीडा संस्था, क्रीडा प्रशिक्षण संस्था, सार्वजनिक व्यायामशाळा, नाट्य संस्था, महिलांच्या सहकारी संस्था व बचत गट, हस्तकला, चित्रकला व तत्सम कलाकृती शिकवणाऱ्य संस्था, संगीत, नृत्य, अभिनय इत्यादी शिकवणाऱ्या संस्था, साहित्यिक चळवळी चालवणाऱ्या संस्था, अंध, दिव्यांग, मुक, कर्णबधीर वा शारीरिक विकलांगासाठी काम करणाऱ्या संस्था, रुग्णांसाठी काम करणाऱ्या संस्था, कुष्ठरोग्यासाठी काम करणाऱ्या संस्था, सामुदायिक विवाह समारंभ आयोजित करणाऱ्या संस्था, सामाजिक उद्दीष्ट्ये असलेल्या अन्य सेवाभावी व विश्वस्त संस्था यांना त्यांच्या कार्याच्या अनुषंगाने अनुदान देण्याचे धोरण असुन अनुदानाची मागणी करणाऱ्या संस्थेचे कार्य व संस्थेची जनमानसात असलेली प्रतिमा लक्षात घेऊन तांत्रिक बाबी पुर्ण करणाऱ्या संस्थेला निधीच्या उपलब्धतेनुसार महानगरपालिकेकडून अनुदान मंजुर करण्यात येईल. अनुदान रोख रक्कम, वस्तू किंवा साहित्य या स्वरुपात देण्याची तरतुद करण्यात आली आहे. विश्वस्त नोंदणीकृत रुग्णालय तसेच निराधार व निराश्रीत मुलींसाठी कार्य करणाऱ्या संस्था, ग्रंथालये व इतर विश्वस्त नोंदणीकृत संस्थाना अनुदानासाठी सन २०२०-२१ मध्ये रु.५० लक्ष तरतुद केली आहे.

**वाचनालय / अभ्यासिका :**

महापालिकेची वाचनालये व विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुविधा उपलब्ध आहे.

महापालिका हद्दीतील १४ शासनमान्य वाचनालयांना प्रोत्साहनपर अ,ब,क वर्गांना अनुक्रमे १ लाख, ७५ हजार, ५० हजार अनुदान वाटप झालेले आहे.

उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेले संदर्भ ग्रंथ - पुस्तके व वाय - फाय सेवा उपलब्ध आहे.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांचे वर्गवारीप्रमाणे अनुदान वाटप होत आहे.

ग्रंथालयाचा वर्ग - 'अ' महानगरपालिकेकडून मंजूर झालेले एकूण अनुदान - १,५०,०००/- इतके आहे.

ग्रंथालयाचा वर्ग - 'ब' महानगरपालिकेकडून मंजूर झालेले एकूण अनुदान - १,००,०००/- इतके आहे.

ग्रंथालयाचा वर्ग - 'क' महानगरपालिकेकडून मंजूर झालेले एकूण अनुदान - ७५,०००/- इतके आहे.

**उड्डाणपूल / रस्ते :** एमएमआरडीएच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रात झालेली व प्रस्तावित केलेली कामे.

मुंबई - वसई प्रवास अंतर कमी करण्यासाठी नायगाव ते भाईंदर रेल्वेला समांतर खाडीपूल. निविदा प्रक्रिया पूर्ण.

तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत विराट नगर, ओसवाल नगरी, अलकापूरी, नायगाव, नालासोपारा पूर्व, विरार फाटा, पार्वती क्रॉस ते स्टेला पेट्रोल पंप असे एकूण सात रॅम्प ब्रीज व रेल्वे  ओवर ब्रीज बांधण्यात येणार आहेत.

प्रस्तावित रेल्वे उड्डाणपूल : विरार -नारंगी, विराट नगर - विरार पूर्व, उमेळमान-राजावली, सेंट्रल पार्क - नालासोपारा (प) अलकापूरी - नालासोपारा (प).

शहरातील प्रस्तावित उड्डाणपूल : बाभोळा नाका, माणिकपूर नाका, नवघर (वसई रोड), वसंत नगरी, रेंज आफिस, चंदन नाका जंक्शन, पाटणकर पार्क जंक्शन, लक्ष्मी शॉपिंग सेंटर जंक्शन, मनवेलपाडा (विरार), फुलपाडा जंक्शन (विरार ), सायन्स गार्डन (विरार), खारोडी नाका (बोळिंज), साईनाथ नगर (नारिंगी)

**मच्छी मार्केट :**

माजी मा.श्री. खासदार बळीराम जाधव व मा. आमदार श्री. क्षितीज ठाकूर यांच्या प्रयत्नाने राज्य व केंद्र शासनाच्या मत्स्य विकास महामंडळाच्या रुपये ६७३ लक्ष अनुदानातून मनपा क्षेत्रात आगाशी, बोळिंज व सोपारा येथे आधुनिक हायजेनिक मार्केट, विरार पूर्व येथे ओले मासे, सुकी मच्छी व भाजीपाला यासाठी बहुद्देशिय मार्केटचे लोकार्पण करण्यात आले आहे. याद्वारे मच्छीमार महिलांना बसायला व्यवस्थित जागा, पाणी उपलब्ध होत आहे तसेच रोजगारही मिळत आहे.

शहरात विविध ठिकाणी शितगृहाच्या व्यवस्थेसह मटन, मासे, फुले, भाज्या मार्केट व फेरीवाल्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून स्थलांतरीत करण्याच्या दृष्टीने गोखिवरे, तामतलाव, नवघर पूर्व व निर्मळ या ठिकाणी नवीन मार्केट बांधणेसाठी ७ कोटी २६ लाख इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

**विकास आराखडयातील रस्ता कामे :**

वसईच्या मंजूर विकास आराखडयात दर्शविलेल्या रस्त्यासाठी जागा संपादन करुन रस्ता विकसीत करण्याची कामे खालीलप्रमाणे हाती घेण्यात येणार असल्याने विरार पश्चिमेकडील विरार स्टेशनला पोहचण्यासाठी रस्त्याची सोय होणार आहे. याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

- विरार पश्चिम जुने पोस्ट ऑफिस जवळील १२ मीटर रस्त्यासाठी जागा संपादन करणे.
- विरार पश्चिम मध्ये प्रथमेश अपार्टमेंट ते मुख्य रस्त्यापर्यंत १२/२० मीटर रस्त्यासाठी जागा संपादन करणे आहे.
- विरार पश्चिम मध्ये ग्रामीण रुग्णालय ते एस.टी.डेपो (गावठण) ९ मीटर रस्त्यासाठी जागा संपादन करणे आहे.
- विरार पश्चिम कै. भास्कर वामन ठाकूर मंडई येथे प्लॅटफॉर्म क्रमांक १ पर्यंत असलेल्या १२/२० मीटर रस्त्यासाठी जागा संपादन करणे.

प्रभाग समिती बी नालासोपारा (पूर्व) वॉर्ड क्र.५२ मधील तुळींज मुख्य रस्ता ते सेंट्रल पार्क रोड पर्यंत १२ मीटर डी.पी रस्त्याचा विकास करणे.

**मागासवर्गीय कल्याणकारी योजना -**

- ❖ महानगरपालिका क्षेत्रातील दलित वस्ती योजना कामे यासाठी सन २०२०-२१ मध्ये रु.३ कोटी तरतुद केली आहे.
- ❖ प्रधानमंत्री आवास योजना अथवा त्या धर्तीवर अन्य योजना कामासाठी सन २०२०-२१ मध्ये रु. १ कोटी तरतुद करणेत आली आहे.

- मागासवर्गीय कल्याणकारी राखीव तरतुदी अंतर्गत रस्ता, गटार व इतर विकास कामे करण्याकरीता सन २०२०-२१ मध्ये रु. २७ कोटी ७७ लक्ष तरतुद करणेत आली आहे.
- आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना खाजगी नविन विहिरी खोदकामासाठी अनुदान सन २०२०-२१ मध्ये रु. १० लक्ष तरतुद केली आहे.
- आर्थिक दुर्बल घटकातील शेतकऱ्यांसाठी कृषी साहित्य विज पंप, फवारणी पंप, जंतुनाशके बियाणे, खत इ. साठी सन २०२०-२१ मध्ये रु.१ कोटी तरतुद केली आहे.
- मच्छिमार व बोटीवरील मजुरांसाठी कल्याणकारी योजना रु.५० लक्ष तरतुद करणेत आली आहे.

**दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजना** :- अंध, दिव्यांग, मुक, कर्णबधिर मुला / मुलींना शैक्षणिक अर्थसहाय्य, अंध किंवा दिव्यांग मुलींच्या विवाहासाठी व ज्यांचे आई आणि वडील दोन्हीही अंध किंवा दिव्यांग आहेत अशा मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य, ४५% ते ७५% या दरम्यान अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या महिलांना स्वयंराजगारासाठी बीज भांडवल म्हणून अर्थसहाय्य, व्यवसायिक प्रशिक्षण पुर्ण केलेल्या गतिमंद / मतिमंद मुला/मुलींना, अंध / दिव्यांग व्यक्तींना स्वयंराजगार निर्मीती म्हणून व्यवसाय करण्यासाठी स्वयंरोजगार सहाय्यता अनुदान, गतिमंद / मतिमंद मुले किंवा मुली अथवा विशेष बालक यांच्या देखभालीसाठी विशेष संगोपन भत्ता, ७५% किंवा त्याहून अधिक अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनींना विशेष शैक्षणिक भत्ता, कुटूंबातील ७५% किंवा त्याहून अधिक अंधत्व किंवा दिव्यांगत्व असणाऱ्या मुलीस / महिलेस विशेष सुसह्य भत्ता. या कल्याणकारी योजना राबविणेसाठी अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे तरतुदी केल्या आहेत.

- दिव्यांग व विशेष व्यक्तींकरीता कल्याणकारी योजना राबविण्याऱ्या संस्थाना वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०२०-२१ मध्ये रु. ४ कोटी ७० लक्ष इतकी तरतुद केली आहे.
- दिव्यांग मुलीच्या लग्नासाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०२०-२१ मध्ये रु. ५ लक्ष तरतुद केली आहे.
- ज्या मुलीचे आई - वडील दिव्यांग आहेत त्यांच्या लग्नासाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०२०-२१ मध्ये रु.५ लक्ष तरतुद केली आहे.
- विशेष मुलांसाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत वितरीत करावयाचे योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०२०-२१ मध्ये रु. ५० लक्ष तरतुद केली आहे.

- कुटुंब प्रमुख ७५% अथवा त्याहून अधिक दिव्यांग असल्यास महिला बाल कल्याण समितीमार्फत महिलांना द्यावयाचे योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०२०-२१ मध्ये रु. १० लक्ष तरतुद केली आहे.
- दिव्यांग, कर्णबधीर व मुकबधीर विद्यार्थ्यांना महिला बाल कल्याण समितीमार्फत शैक्षणिक योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकरीता सन २०२०-२१ मध्ये रु.५ लक्ष तरतुद केली आहे.
- दिव्यांग व विशेष व्यक्तींकरिता कल्याणकारी योजनेंतर्गत भांडवली कामे याअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये रु. १२० लक्ष इतकी तरतुद केली आहे.

**ज्येष्ठ नागरिक :**

ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य सेवा, नाना नानी पार्क, विरंगुळा केंद्र, बस प्रवास व स्विमिंग पूल यामध्ये सवलत, अशा अनेक प्रकारच्या सेवा जेष्ठ नागरिकांसाठी मा. आमदार श्री. हितेंद्र ठाकूर व मा. आमदार श्री. क्षितीज ठाकूर यांच्या प्रयत्नांनी कार्यान्वयीत आहे.

**महिला व बालकल्याण :** "जेंडर बजेट" म्हणजे "महिलांसाठी अर्थसंकल्पात नुसती तरतूद करणे" असे नसून, अर्थसंकल्पीय तरतूद करताना त्या त्या कामात महिलांच्या समस्या आणि गरजा कशा भागविल्या जातील हे बघणे आहे. महानगरपालिका मध्ये निर्णय घेताना, अंमलबजावणी करताना त्या त्या कामात महिलांच्या समस्या आणि गरजा कशा भागविल्या जातील हे बघणे आहे. महानगरपालिकामध्ये निर्णय घेताना, अंमलबजावणी करताना, खर्च करताना महिला, बालके, मुले-मुली इ. घटकांच्या समस्या व गरजा यांचा विचार करुन त्या सोडवण्यासाठी निर्णय घेणे आणि महिलांचा सहभाग घेणे म्हणजे "जेंडर बजेट" होय.

महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत आपण अनेक कल्याणकारी योजना राबवित असून आपली महानगरपालिका याबाबत महाराष्ट्र राज्यात अग्रेसर महानगरपालिका आहे याचा आपणांस अभिमान आहे. हे आनंदपूर्वक नमुद करी इच्छितो.

बालवाडी तसेच प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपकरणे, शाळांच्या आवश्यकतेनुसार संगणक पुरवणे, शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक पास योजना, नोकरदार महिलांसाठी वसतीगृह, निराधार महिलांसाठी तात्पुरते निवारा केंद्र इत्यादी अनेक सेवा महानगरपालिका पुरवित आली आहे. त्याचबरोबर जननी शिशु सुरक्षा योजनेच्या लाभासह प्रसुत महिलांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर रुपये १६००/- चा भत्ता देणे, महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करणे, विधवा महिलांच्या मुलींच्या

विवाहासाठी ठोक अनुदान व मुलांच्या शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे, स्त्री रोग चिकित्सा शिबीर, उत्कृष्ठ कामांसाठी महिलांचा गौरव विविध योजना मनपाच्य म.बा.क विभागातर्फे राबविण्यात येत आहेत.अशा अनेक प्रकारच्या योजनांसाठी महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत सन २०२०-२१ साठी रुपये २३ कोटी ५४ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

## भुयारी गटार :

भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण - ६६ कोटीच्या भुयारी गटार योजनेतील STP-२ चे काम पुर्ण.

रुपये १२३८ कोटीची सुधारित योजना महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीसह केंद्र शासनाकडे सादर.

१)केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटी कार्यक्रमांतर्गत रु. ६६.२२ कोटी रकमेच्या वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विरार शहर भुयारी गटार प्रकल्पास (STP-२) दि. १८/८/२०११ रोजी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. सदर योजनेतील काम पुर्ण झाले असून, मलनि:स्सारण प्रकल्प (क्षमता ३० MLD) ऑगष्ट २०१७ मध्ये कार्यान्वीत करण्यात आला आहे. वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए , बी व सी अंतर्गत मुख्य मल:निसारण वाहिनीला इमारतीच्या मलनि:स्सारण वाहिनीची जोडणी करणेचे काम प्रगतीपथावर चालू आहे.

२)महाराष्ट्र शासनाने अमृत कार्यक्रमांतर्गत सन २०१७/१८ साठीच्या वार्षिक कृति आराखडयात वसई विरार मलनि:सारण योजनेकरीता रु.१७० कोटीच्या प्रस्तावास मान्यता दिली असुन अद्यापही निधी प्राप्त झालेला नाही. या रकमेच्या अधीन राहुन पुर्ण प्रस्तावात समाविष्ठ असलेल्या ७ झोन पैकी नालासोपारा झोन क्र.३ चे मलनि:सारण योजनेचे काम अमृत योजना २०१७/१८ अंतर्गत हाती घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदरच्या मलनि:सारण योजनेचे प्रकल्प अहवाल, संकल्पन आराखडे, नकाशे अंदाजपत्रके बनविण्याचे काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरणा मार्फत सुरु आहे.

**पाणीपुरवठा :** १९९० साली वसई तालुक्याला केवळ ६ एमएलडी (६० लक्ष लिटर) पाणी प्रतिदिन उपलब्ध होते. आज २०१९ साली २३० एमएलडी (२३ कोटी लिटर) पाणी प्रतिदिन उपलब्ध होत आहे. प्रस्तावित सर्व पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यावर ९०० एमएलडी (९० कोटी लिटर) पाणी प्रतिदिन उपलब्ध होईल. यासाठी महापालिकेने आतापर्यंत करोडो रुपये खर्च केलेले आहेत. महानगरपालिका क्षेत्राला सद्या सुर्या, उसगाव व पेल्हार या पाणीपुरवठा योजनांमधून प्रतिदिन २३१ दश लक्ष लिटर्स पाणीपुरवठा होत आहे

- केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत ३१० कि.मी. जलवाहिनी अंथरणे व विविध ठिकाणी १८ जलकुंभ बांधणे ही कामे प्रगती पथावर आहेत.
- महानगरपालिकेत समाविष्ठ गावांच्या वाढीव विकसित भागात पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने नव्याने जलवाहिन्या खरेदी करणे कामी पहिल्या टप्प्यात र. ४.५० कोटी मान्यता देण्यांत आली असून सदर जलवाहिन्या अंथरणेकामी कार्यादेश दिले आहेत. तसेच दुसऱ्या टप्प्यात रु. १९ कोटीचे पाईप खरेदी करण्यांस मान्यता प्राप्त झाली असून त्यापैकी रु. १०.५४ कोटीचे पाईप सन २०१९-२० मध्ये खरेदी कामी कार्यवाही सुरु करण्यांत आली आहे.
- सुर्या- १ उसगांव योजनेतील पी.एस.सी. मुख्य जलवाहिन्या ऐवजी नविन पोलादी जलवाहिन्या बदलणे प्रस्तावित करण्यात आले आहे. धुकटन येथील जलशुध्दीकरण केंद्रात वाया जाणारे पाणी पुर्न:वापर यंत्रणा बसवुन सदर पाणी वापरास घेण्याचे प्रस्तावित असुन यातुन २ ते ३ द.ल.ली. पाणी जादा उपलब्ध होणार आहे.
- पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र येथे अद्यावत जलशुध्दीकरण यंत्रे बसविण्यास रु. ३.५० कोटी खर्चास मान्यता देण्यांत आली असून निविदा कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. सदर काम पुढील वर्षात पुर्ण होणार आहे.
- उसगांव व सुर्या योजनेतील जुने पंप बदलणे प्रस्तावित करण्यांत आले आहेत.
- महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येस पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने खोलसापाडा १ व २ ही धरणे बांधकामासाठी अंदाजे रु. १५० कोटी खर्चास महानगरपालिकेने प्रशासकीय मान्यता दिली असून जलसंपदा विभागामार्फत कामे हाती घेण्यात येत आहेत.
- देहरजी, सुसरी, सातिवली, राजीवली, कामण, कवडास बंधाऱ्याची उंची वाढविणे इ. प्रकल्पांच्या दृष्टीने आवश्यक तरतुद करण्यात आली असून एम.एम.आर.डी.ए च्या सुर्या ४०३ द.ल.ली. योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत त्यातून महानगरपालिकेस १८५ द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे.
- महानगरपालिका क्षेत्रात सुमारे ४६ हजार नळ जोडण्या देण्यांत आल्या असून त्यांना टप्प्या टप्प्याने जलमापके बसविण्याची कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे. पुढील वर्षात १२ हजार जोडण्यांना जलमापके बसविल्यास त्यासाठी रु. २ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.
- धुकटण येथील जल शुाद्धीकरण केंद्र वाया जाणाऱ्या पाण्याचा परत वापर करण्यासाठीची यंत्रणा वापरात घेण्याचे प्रस्तावित आहे. देहरजी, सुसरी, सातवली, राजवली, कामण, कवडास इत्यादी धरणाची उंची वाढविण्याची तरतुद करण्यात आली आहे. तसेच पावसाचे पाणी साठविण्यासाठीचे नियोजन ही चालू आहे. उसगाव व सुर्या योजनेतील जुने

**पंप बदलणे प्रस्तावित आहे, तसेच केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत ३१० किलोमीटरची जलवाहिनी अंथरणे व विविध ठिकाणी १८ जलकुंभ बांधणे ही कामे प्रग्रतीपथावर आहेत.**

**पाणी पुरवठयावर सन २०२०-२१ मध्ये रु. २७१ कोटी ८५ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.**

**पावसाळ्यापूर्वीची कामे :** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग समिती मध्ये पावसाळ्यापूर्वी नालेखोदाई करणे, गाळ काढणे, साफसफाई करणे, गाळ वाहून नेणे वगैरे कामे करणे अत्यावश्यक व गरजेचे असल्याने ही कामे आता पासूनच सुरु केली जाणार आहेत. महापालिका हद्दीतील सुमारे एकूण २१०.१५ कि.मी.चे नाले सफाई करण्यात येणार आहेत.

त्याचबरोबर निरी व आय.आय.टी ने पुर परिस्थितीत बाबत जो अहवाल दिला आहे त्यानुसार पुरप्रतिबंधक उपाययोजनेसाठी त्यांनी महत्वाची कामे सुचविले आहेत. त्याप्रमाणे आवश्यक ते नियोजन व तरतूद करण्यात आली आहे.

**वृक्ष संवर्धन** : वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्षांचे संवर्धन व जतन अधिनियम १९७५ अन्वये महानगरपालिकेने आपल्या शहराचा भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन वृक्षप्राधिकरण विभागाअंतर्गत वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरीता विविध योजनेची आखणी करुन ते अंमलात आणले आहे. जसे शहरामध्ये शासनाच्या धोरणानुसार आपल्या हद्दित नागरी वनीकरण करणे तसेच रस्ता दुतर्फा महानगरपालिकेचे आरक्षित उद्याने, मैदाने, स्मशानभुमी या परिसरात प्रामुख्याने स्थानिक प्रजातीची लागवड करणे जसे कडुनिंब, पिंपळ, वड, औंदुबर, आवळा, चिंच व इतर वृक्ष

महानगरपालिकेने आपल्या कार्यक्षेत्रालगत अवनत वनक्षेत्रावर सन २०१७ ते सन २०२१ पर्यंत वन विकास महामंडळ व वनविभाग यांच्या सोबत त्रिपक्षीय करार करुन वन जमिनीवर मानव निर्मित जंगल (Urban Forestry) तयार करणेत येत आहे. या योजने अंतर्गत पर्यटन विकासाच्या अनुषंगाने ग्रीन पार्क आणि पक्षी उद्यान तयार करणेत येणार आहे.

वृक्ष संवर्धनाच्या माध्यमातून नागरीकांमध्ये पर्यावरणाबद्दल रुची वाढावी यासाठी माफक दरात फळ रोपे उपलब्ध करुन देणे, औषधांची फवारणी करणे, नक्षत्र व वनस्पती उद्यान, विज्ञान उद्यान विकसीत करणे तसेच वृक्ष रोपणासह वृक्षसंवर्धनासाठी महाराष्ट्र हरित सेना ही संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

**परिवहन सेवा :** शहरामध्ये विविध ठिकाणी महापालिकेने सुरु केलेली असून यामध्ये दररोज सुमारे ८० हजार इतके प्रवासी प्रवास करित आहेत. अलिकडेचे लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने शहरातील जेष्ठ नागरिक, कर्करोग बाधीत रुग्ण, डायलेसीस रुग्ण यांना परिवहन सेवा अंतर्गत मोफत सेवा पास वितरण केले आहे. आतापर्यंत शहरातील सुमारे एक हजार नागरिकांना मोफत बस योजनेचे पास वितरित केले आहे.

## बांधकाम व्यवस्था:-

रस्ता बांधकाम, रॅम्प ब्रीज व इतर ब्रीज, तलाव सुशोभिकरण करणे. क्रिडा संकुल व स्टेडीयम बांधकाम, रुग्णालय बांधकाम, वाचनालय व्यवस्था, उद्यान विकास, आरक्षित जागेचा विकास, नाटयगृह, पुरप्रतिबंधक कामे, मल:निसारण जोडण्या, शितगृह बहुद्देशिय मार्केट, दहन दफन भूमी विकास, अग्निशमन दल व्यवस्था, नाले सफाई, गटार बांधकाम यासह विविध विकास कामाकरिता लेखाशिर्षनिहाय भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत.

## सन २०२०-२१ मध्ये खालील प्रमाणे विकास कामे करणे प्रस्तावित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ११५ मधील विकास आराखड्यामधील ३० मी. रुंदीचा कामण बापाणे रस्त्याचे बांधकाम | २ | विरार पश्चिमेकडील रेल्वे स्टेशनपासून बोळिंज जकात नाका पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण. |
| ३ | विरार प. म्हाडा मैदान ते नालासोपारा पेट्रोलपंप पर्यत ३० मी. रुंदीचा डि.पी रस्ता. | ४ | नालासोपारा पुर्वेकडील रेल्वे स्टेशनपासुन तुळींज मुख्य रस्ता (जुना टोल नाका) पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण. |
| ५ | प्रभाग समिती ए येथील विरार प. प्रभाग क्र. ३ मध्ये भवानी मंदीर ते मारंबळपाडा जेट्टी पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण. | ६ | नालासोपारा पश्चिमेकडील रेल्वे स्टेशनपासुन शुर्पाक मैदान पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण. |
| ७ | प्रभाग समिती बी पेल्हार क्षेत्रातील फणसपाडा ते वैतरणा स्टेशन पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण. | ८ | वसई पश्चिमेकडील रेल्वे स्टेशनपासुन वर्तक चौक ते पंचवटी हॉटेल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण. |
| ९ | प्रभाग समिती बी पेल्हार क्षेत्रातील अमुल डेअरी, कणेर ते वैतरणा स्टेशनपर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण. | १० | वसई पश्चिमेकडील रेल्वे स्टेशनपासुन माणिकपुर पेट्रोलपंप पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण. |
| ११ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ११५ मध्ये कामण बापाणे डि. पी. रस्ता | १२ | प्रभाग समिती आय वॉर्ड क्र. ११२ मधील पोलीस लाईन पाठीमागील १२ मी डी.पी. रस्ता |
| १३ | प्रभाग समिती डी येथील वॉर्ड क्र. ८० मध्ये एव्हरशाईन सिटी येथे विद्याविकासीनी शाळा ते फादरवाडी येथे (१२ मी डी. पी.) चा मुख्य रस्ता | १४ | प्रभाग समिती बी वॉर्ड क्र. ५२ तुळीज मुख्य रस्ता ते सेंट्रल पार्क रोड (१२ मी. डी.पी)पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | विरार पुर्वेकडील रेल्वे स्टेशनपासुन आर.जे हॉटेल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण. | १६ | प्रभाग समिती डी आचोळे येथील सर्वे क्र. ६ मध्ये रुग्णालयाचे बांधकाम |
| १७ | प्रभाग समिती डी नालासोपारा (पू) येथील मजेठीया नाट्यगृहाचे नुतनीकरण | १८ | प्रभाग समिती एच कॉल सिटी येथे रुग्णालयांचे बांधकाम |
| १९ | मौजे मालोंडे येथील आरक्षित जागेत नाट्यगृहाचा विकास | २० | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र.१०५ मध्ये जुचंद्र परीसरात ७० बेड चे हॉस्पीटलचे बांधकाम. |
| २१ | प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील प्रभाग क्र. ९४ मध्ये निर्मळ शंकराचार्य मंदीरालगत सभागृहाचे बांधकाम | २२ | प्रभाग समिती ऐ विरार (प) प्रभाग क्र. ३२ बोळिंज येथे नागरी आरोग्य केद्राचे बांधकाम. |
| २३ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे बोळिंज आरक्षण क्र.१६२ (प्ले ग्राऊंड) मध्ये क्रिंडासंकुल व क्लब हाऊसचे बांधकाम. | २४ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील सर डी.एम.पेटीट रुग्णालयाच्या इमारतीचे नुतनीकरण. |
| २५ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ७५ मध्ये सातीवली येथे राखीव भुखंड जागेत तरण तलाव व स्पोर्टस कॉम्प्लेक्सचे बांधकाम. | २६ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. १०५ मध्ये जुचंद्र येथे आरोग्य केद्राचे बांधकाम. |
| २७ | नालासोपारा सर्वे क्र. ३२ येथे क्रिडांगणाचे विकास | २८ | प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७२(१०३) मधील सलोली येथील बरमाळे तलावाचे सुशोभिकरण. |
| २९ | विरार (प) प्रभाग क्र. ९ मध्ये भोंगाळे येथील तलावाचे सुशोभिकरण. | ३० | वॉर्ड क्र. १०३ मधील गिरीज टोकपाडा तलावाचे सुशोभिकरण करणे. |
| ३१ | प्रभाग समिती एफ पेल्हार क्षेत्रातील वाकणपाडा तलावाचे सुशोभिकरण. | ३२ | प्रभाग समिती एफ पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पुर्व येथील प्रभाग क्र. ५९ मधिल श्री. नंदु किणी यांच्या घराजवळील तलाव क्र. १चे सुशोभिकरण. |
| ३३ | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील वॉर्ड क्र. ५६ नाळे तलावाचे सुशोभिकरण. | ३४ | नालासोपारी (पु) वॉर्ड क्र. २७ मधील मनवेल पाडा तलावाचे सुशोभिकरण. |
| ३५ | प्रभाग समिती एफ पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पुर्व येथील बिलालपाडा तलावाचे सुशोभिकरण . | ३६ | प्रभाग समिदी जी वॉर्ड नं. ८९ मध्ये कामण पिराचा तलावाचे सुशोभिकरण. |
| ३७ | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील मांडवी तलावाचे सुशोभिकरण. | ३८ | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील पापडी तलावाचे सुशोभिकरण. |
| ३९ | प्रभाग समिती जी मधील गोखिवरे तलावाचे सुशोभिकरण . | ४० | विरार (पु) प्रभाग क्र. १ मध्ये गासकोपरी तलावाचे सुशोभिकरण |
| ४१ | प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७२(१०३) मधील गिरीज तलावाचे सुशोभिकरण. | ४२ | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) वॉर्ड क्र. ५६ भदाळे तलाव सुशोभिकरण. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४३ | प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७२(१०३) मधील सालोली येथील उतळेश्वर तलावाचे सुशोभिकरण. | ४४ | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए , बी व सी अंतर्गत मुख्य मल:निसारण वाहिनीला इमारतीच्या मलनि:सारण वाहिनीची जोडणी करणे. |
| ४५ | प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) प्रभाग क्र. ८४ मधील गणेश तलावाचे सुशोभिकरण. | ४६ | Construction Of Holding Ponds as per Sanctioned DP |
| ४७ | Clearance and Restoration Of Natural Water Courses | ४८ | Installation Of Automated Gates |
| ४९ | Creation of Additional Storm Water Channels | ५० | Installation Of Weather Stations |
| ५१ | Raising Of Road Level | ५२ | प्रभाग समिती एच मध्ये वॉर्ड क्र.९५ खलाटीपाडा येथे सुर्यास्त उद्यानाचा विकास |
| ५३ | विरार पू. नारंगी येथील पिकनीक पार्कचा विकास | ५४ | प्रभाग समिती जी वॉर्ड नं. ९० मध्ये सातीवली तलाव येथील आरक्षित उद्यानाचा विकास |
| ५५ | विरार पू. आरक्षण क्र. १४२ मध्ये बोटनिकल पार्कचे बांधकाम. | ५६ | प्रभाग समिती जी वॉर्ड मध्ये गोकुळ नगरी उद्यानाचा विकास |
| ५७ | पेल्हार धरणालगत आरक्षण क्र. ८५१ येथे पिकनीक पार्कचा विकास | ५८ | प्रभाग समिती जी वॉर्ड नं. ७४ मध्ये स.न. ६८ मध्ये उद्यानाचा विकास |
| ५९ | प्रभाग समिती डी येथील वॉर्ड क्र. ८० मध्ये एव्हरशाईन सिटी येथे विद्याविकासिनी शाळेसमोरील उद्यानासाठी आरक्षित असलेल्या जागेत उद्यानाचा विकास | ६० | नालासोपारा (प) आरक्षण क्र. ३८८ स.न. ३६/१ ब येथील आरक्षित उद्यानाचा विकास. |
| ६१ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील पापडी चणेबोरी उद्यानाचा विकास | ६२ | प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र. ९२ नवघर (पू) येथे बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम |
| ६३ | प्रभाग समिती जी गोखिवरे येथे बहुउद्देशीय मार्केटचे बांधकाम | ६४ | प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील प्रभाग क्र. ९४ मधील निर्मळ येथे मार्केट शेड व इमारतचे बांधकाम |
| ६५ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रात तामतलाव येथे मार्केटचे बांधकाम | ६६ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील उमेळा फाट येथील पापडी औद्योगीक वसाहतीच्या मुख्य प्रवेशव्दारा जवळ अग्नीशमन केंद्राचे बांधकाम |
| ६७ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ७४ मध्ये वालीव येथील सर्वे नं. ६८ मध्ये अग्नीशमन केंद्राचे बांधकाम | ६८ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वसई नर्सरी बाग येथे अग्नीशमन केंद्राचे बांधकाम |
| ६९ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. १०५ मध्ये परेरा नगर येथे अग्नीशमन केंद्राचे बांधकाम | ७० | प्रभाग समिती एच मध्ये दफनभूमीचा विकास |

| | | | |
|---|---|---|---|
| ७१ | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मध्यवर्ती वाचनालयाचे बांधकाम (टाऊन लायब्ररी) | ७२ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ८९ मध्ये कामण स्मशानभूमीचा विकास |
| ७३ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ११५ मध्ये बापाणे येथे स्मशानभुमीचा विकास | ७४ | प्रभाग समिती डी अंतर्गत तुळींज स्मशानभूमीचा विकास |
| ७५ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ९० मध्ये कोल्ही येथील स्मशानभूमीचा विकास | ७६ | प्रभाग समिती ई नालासोपारा (प) येथील प्रभाग क्र. ५७ मधील समेळ स्मशानभुमीचा विकास |
| ७७ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ९० मध्ये तारकेनगर येथील स्मशानभूमीचा विकास | ७८ | प्रभाग समिती एफ धानिव पेल्हार क्षेत्रातील शिरसाड गावात स्मशानभुमीचे बांधकाम |
| ७९ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०७ किरवली स्मशानभुमीचा विकास | ८० | प्रभाग समिती एफ धानिव पेल्हार क्षेत्रातील खैरपाडा येथे स्मशानभुमीचा विकास |
| ८१ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ पापडी स्मशानभुमीचा विकास | ८२ | विरार (प) प्रभाग क्र. १५ पुरापाडा स्मशानभूमीचा विकास |
| ८३ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०८ तांबडीपाडा स्मशानभुमीचा विकास | ८४ | विरार (प) प्रभाग क्र. १५ आगाशी स्मशानभुमीचा विकास |
| ८५ | विराटनगर येथील रेल्वे ओव्हर ब्रीजचे बांधकाम | ८६ | नालासोपारा पुर्व पश्चिम कडील जोडणारा वाढीव रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम |
| ८७ | ओस्वाल नगरी रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम | ८८ | विरार (पूर्व) रेल्वे फाटक क्र. ४० येथे रॅम्प ब्रीजचे बांधकाम |
| ८९ | अलकापुरी येथील रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम | ९० | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच मध्ये पार्वती क्रॉस ते स्टेला पेट्रोल पंप पर्यत फ्लाय ओव्हर ब्रिज बांधणे. |
| ९१ | नायगांव येथील रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम | ९२ | प्रभाग समिती डी मध्ये आचोळे सर्व्हे नं. ६ मध्ये मैदानाचा विकास. |
| ९३ | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पे ॲन्ड पार्क विकसीत करणे | ९४ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ७४ मधील अप्पा मैदानाचा विकास. |
| ९५ | प्रभाग क्र. २० मध्ये विरार (प) जुने पोस्ट ऑफीस जवळील १२ मी. DP रस्ता विकसीत करणे. | ९६ | प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील आरक्षण क्र. २९९ (मौजे निळेमोरे) येथे प्ले ग्राऊंडचा विकास. |
| ९७ | प्रभाग क्र. २९ मध्ये विरार (प) प्रथमेश अपार्ट ते मुख्य रस्त्यापर्यत १२/२० मी. DP रस्ता विकसीत करणे. | ९८ | प्रभाग समिती ई आरक्षण क्र. ३९१ येथे प्ले ग्राऊंडचा विकास. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९९ | प्रभाग क्र. ३१ मध्ये विरार (प) ग्रामीण रुग्णालय ते एस.टी.डेपो (गावठण) ९ मी DP रस्ता विकसीत करणे. | १०० | पापडी ब्राम्हण आळि ते स्टेटस हॉटेल २० मी DP रस्ता विकसीत करणे. |
| १०१ | प्रभाग क्र. २९ मध्ये विरार (प) कै. भास्कर वामन ठाकूर मंडई ते प्लॅटफॉर्म क्र. १ पर्यंत असलेल्या १२/२० मी DP रस्ता विकसीत करणे. | १०२ | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ८८ मध्ये भोयदापाडा येथे सर्वे. ५३२ येथे पार्किंग लॉट व बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम |
| १०३ | प्रभाग क्र. २० मध्ये विरार (प) शक्ती सदन बिल्डींग लगतचा DP रस्ता विकसीत करणे. | १०४ | |

आणि अत्यंत महत्वाचे म्हणजे आपण सर्वांना माहित असेलच की काही महानगरपालकिा ह्या काही कारणांनी वादग्रस्त होतात, पण ज्या अर्थी आपल्या वसई विरार शहर महानगरपालिकेच्या या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही करवाढ करण्यात आलेली नाही, आस्थापना खर्च विहीत टक्केवारीपेक्षा, म्हणजेच ३५ टक्के पेक्षा कमी आहे. कर्जाचे प्रमाण जमा खर्चाच्या तुलनेत नगण्य आहे. कर्मचाऱ्यांचा जी.पी.एफ निधी व पेंशन निधी नियमांनुसार ठेवला आहे. योजनांच्या तरतूदी इतरत्र वळवण्यात आलेल्या नाहीत, किमान रोख शिलकेची स्थिती समाधानकारक आहे. ठेवी कोणत्याही एकाच बँकेत ठेवलेल्या नसून वेगवेगळया बँकेत ठेवल्याने सुरक्षित आहेत, त्या अर्थी आपल्या महानगरपालिकेमध्ये आर्थिक शिस्तीचे योग्य पालन होत आहे हे सिध्द झालेले आहेत.

असा हा **सन २०१९-२०२० प्रारंभिक शिल्लक रु. ५९९ कोटी १० लक्ष, जमा रु. १३१९ कोटी १७ लक्ष व खर्च १३५१ कोटी ३२ लक्ष च्या सुधारीत अर्थसंकल्पासह व सन २०२०-२१ प्रारंभिक शिल्लक ५६६ कोटी ९४ लक्ष, जमा रु. १४७५ कोटी ४३ लक्ष व खर्च १९६१ कोटी ६३ लक्ष आणि ८० कोटी ७४ लक्ष शिल्लकेचे असे एकूण २०४२ कोटी ३७ लक्ष रकमेचे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक** सर्वसमावेशक बहुजनांच्या प्रगतीचा, विकासाचा अर्थसंकल्प तयार करताना मा. महापौर, मा. उपमहापौर यांचे मौलीक मार्गदर्शन तसेच मा. सभागृह नेते, मा. गटनेते, मा स्थायी समिती सदस्य, मा. महिला बाल कल्याण समिती सभापती, मा. परिवहन समिती सभापती, सर्व प्रभाग समित्यांचे सन्मा. सभापती, मा. आयुक्त व त्यांचे सहकारी, नगर सचिव व त्यांचे सहकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याची मी जाणीवपूर्वक नोंद घेत आहे.

आपल्या कामातून "प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास" हे महानगरपालिकेचे ब्रीदवाक्य सार्थ होईल याची मला खात्री आहे त्यासाठी आपण सर्व प्रयत्न करुया.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने वेळोवेळी सहकार्य केले आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. मा. स्थायी समितीने मंजुर केलेला हा अर्थसंकल्प मी आपणासमोर सादर केला असून ही संधी लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. राजेशजी पाटील साहेब, मा. प्रथम महिला महापौर महोदया, सौ. प्रविणाताई ठाकूर मॅडम, मा. महापौर श्री. प्रविणजी शेट्टी साहेब. मा. उपमहापौर श्री. प्रकाशजी रॉड्रीग्ज साहेब. माजी उपमहापौर मा. श्री. उमेशजी नाईक साहेब, सर्व आजी माजी पदाधिकारी व माझे मा. स्थायी समितीतील सर्व सहकारी तसेच माझ्या पक्षातील सर्व सन्मा सदस्य व कार्यकर्ते यांनी दिली याबद्दल मी या सर्वांचा सदैव ऋणी राहीन.

मा. स्थायी समितीने मंजूर केलेला अ व क अर्थसकंल्प तसेच परिवहन समिती ब अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, विशेष निधी अंदाजपत्रके व कर्ज निधी अंदाजपत्रक मंजुर करणेस आपणांस विनंती आहे.

धन्यवाद ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपला,

(प्रशांत राऊत)
सभापती
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका